# सारांश
# (Summary)


भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे असहकार आंदोलन, चलेजाव चळवळ, सविनय कायदेभंग या सारख्या अनेक परंतु महत्त्वपूर्ण जनआंदोलनाचा परिपाक होय. त्यातील इ.स. १९३० मध्ये भारतात सुरु झालेले दुसरे व्यापक राष्ट्रीय आंदोलन म्हणजे सविनय कायदेभंग चळवळ होय. या चळवळीमुळेच भारतीय जनतेला स्वातंत्र्य लढ्यामध्ये सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली. या जनआंदोलनामध्ये भारतातील सर्व स्तरातील जनता तसेच स्त्रियांचा सहभाग होता.

लोकमान्य टिळकांच्या विदर्भातील दौऱ्यांपासून विदर्भात त्यांच्या जहाल राष्ट्रीय विचाराला लोकांचा पाठींबा मिळत गेला. विदर्भातील टिळकांचे अनुयायी त्यांच्या विचारांचा जोरात प्रचार करु लागले. टिळकांच्या अनुयायांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कुटुंबियांवरही व तळागाळातल्या सर्व सामान्य जनतेवर ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेबरोबर भारतात राजकीयच परिवर्तनाबरोबरच सामाजिक परिवर्तन सुरु झाले. भारतात धार्मिक व सामाजिक प्रबोधनाबरोबरच वैचारिक क्रांती सुरु झाली. भारतीय महिलांच्या अगतिक, दयनीय परिस्थितीकडे आद्य सुधारकांचे लक्ष गेले. महिलांना शिक्षण दिल्यास त्यांच्या उन्नतीचा मार्ग खुला होईल या धारणेतून स्त्री शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. शिक्षणाबरोबर महिलांमध्ये नवे विचार रुजू लागले, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होऊ लागला. सामाजिक जाण निर्माण होऊ लागली आणि घराच्या चार भिंतीच्या बाहेर पाऊल ठेवण्याचे मनोधैर्य त्यांच्यात निर्माण झाले. महिलांमध्ये राजकीय जाणिव निर्माण होण्याची ही पूर्व तयारी होती. या दरम्यान भारतात राष्ट्रवादाचा उदय झाला. भारतीयांना पाश्चात्य राज्यकर्त्यांकडून न्याय, अधिकार मिळावेत या हेतूने राष्ट्रीय सभा स्थापन झाली. प्रारंभी मवाळ असणारी राष्ट्रीय सभा लोकमान्य टिळक व त्यांच्या जहाल सहकाऱ्यांच्या प्रेरणेने जहाल राष्ट्रवादी बनू लागली. या प्रक्रियेला महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाने प्रचंड गती दिली. भारतीय स्त्री मुक्तपणे व उत्साहाने राजकीय क्षेत्रात

वावरु लागली. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होवू लागली. राष्ट्रीय कार्यासाठी शारीरिक हालअपेष्टा सोसू लागली. स्वातंत्र्य संग्रामातील हे महत्त्वाचे व मोलाचे पर्व ठरले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात भारतातील निरनिराळ्या प्रमाणेच वऱ्हाडातील सर्व भागातील जनता व महिला जुलमी सत्तेविरुद्ध आघाडीवर होत्या. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून विदर्भात सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली. पाश्चात्य शिक्षणाची सुरुवात होऊन मुलींसाठी शाळा स्थापन झाल्या. पश्चिम महाराष्ट्रात सुरु झालेल्या वैचारिक प्रबोधनाचे वारे विदर्भात सुशिक्षित व सुबद्ध वर्गात मुळ धरु लागले. एकोणविसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात महिलांच्या उन्नतीचे कार्य करण्यासाठी हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या का होईना, पण महिला पुढे सरसावल्या. या सामाजिक प्रबोधनातून वऱ्हाडच्या महिलात राजकीय जाणिवेचा उदय होवू लागला. या शतकाच्या अखेरीस राष्ट्रवादी विचारांचा स्त्रोत काही वैदर्भीय महिलांना राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करु लागला.

गांधी युगात वऱ्हाडातील सामान्य जनतेचा व महिलांच्या चळवळीमधील सहभाग वाढला सविनय कायदेभंग चळवळीच्या काळात सत्याग्रही महिलांची संख्या लक्षणीयरित्या वाढली. ग्रामीण भागातील शेकडो महिला शहरी महिलांच्या बरोबरीने सत्याग्रहात सहभागी झाल्या. या काळात अनेक महिलांना तुरुंगात डांबण्यात आले. या काळात विदर्भातील अनेक महिलांची धडाडी व नेतृत्वगुण दिसून आले. कायदेभंग चळवळीच्या काळात पुरुषांना महिलांच्या कर्तृत्वाचा, धडाडीचा, त्यागप्रवृत्तीचा प्रत्यय आला.

सविनय कायदेभंग चळवळ दोन टप्प्यात घेण्यात आली असून पहिला टप्पा म्हणजे मिठाचा सत्याग्रह होय. १२ मार्च १९३० रोजी मिठाचा कायदा मोडुन सत्याग्रहाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने दांडी यात्रेला प्रारंभ करण्यात आला. मिठाचा कायदा मोडण्याचा निर्णय देशातील अगदी तळागाळाच्या सामान्यातील सामान्य माणसाला स्पर्शुन गेला. नमक का कानुन तोड दो असे आवाहन गांधीजींनी सामान्य जनतेला केले. ६ एप्रिल १९३० रोजी समुद्र-किनाऱ्यावरील मीठ उचलून कायदेभंग करण्यात आला. या इशाऱ्याबरोबर देशभर कायदेभंगाला प्रारंभ झाला सुमारे ५ हजार गावी मीठाचा कायदा मोडण्यास हजारोच्या संख्येत लोक एकत्र आले ही कृती प्रतिकात्मक होती. ह्या कृतीने भारतासाठी कायदे करणाऱ्या ब्रिटीश

सरकारच्या अधिकाराला आव्हान देण्यात आले. जवाहरलाल नेहरु यांनी अचानक मीठ हा शब्द गुढ मंत्रासारखा बनवला तो शब्द सत्तेचा निदर्शक बनला असे आत्मचरित्रात म्हटले आहे.

प्रत्येक खेड्याने बेकायदेशीर मीठ आणावे किंवा बनवावे. भगिनींनी दारुच्या दुकानांवर, अफुच्या अड्ड्यांवर व परदेशी कापडाच्या दुकानांवर निरोधने करावीत. प्रत्येक घरातील तरुणांनी व वृद्धांनी दररोज टकळीवर सूत कातावे व सुताचे कपडे विणून घ्यावे, परदेशी कापडाची होळी करावी, हिंदुंनी अस्पृश्यतेचा त्याग करावा, अल्पसंख्यांकांचे समाधान केल्यानंतर जे उरेल त्यावर बहुसंख्यकांनी समाधान मानावे, विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजेस सोडावित, सरकारी नोकरांनी आपआपल्या नोकरीचा राजीनामा देऊन लोकसेवेला वाहुन घ्यावे, तेवढे केले तर पुर्ण स्वराज्य आपोआप आपल्या दाराशी येऊन पोहचलेले आपणास लवकरच दिसेल. या पार्श्वभूमीवर अहिंसात्मक कायदेभंगाची चळवळ देशात आणि विदर्भाच्या आठही जिल्ह्यात सुरु झाली.

गांधीजीची दांडी यात्रा सुरु झाली तेव्हा लढ्यात उडी घेण्यास अनेक स्त्रिया अधीर झाल्या होत्या. तेव्हा परदेशी कपड्यावर बहिष्कार आणि दारुविक्री विरुद्ध निदर्शने करण्याची मोहिम स्त्रियांनी हाती घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

जेथे मिठाचा कायदा मोडणे शक्य नव्हते तिथे इतर कायदे मोडण्याचे तंत्र सामान्य जनतेने अवलंबिले. सभा, मिरवणूकांवर बंदी घालणारे, वृत्तपत्रांवर निर्बंध लावणारे अनेक अध्यादेश मोडल्या गेले. यामुळे ब्रिटीश सरकारने सदर चळवळीचा कणा मोडण्याकरीता गांधीजी, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरु या सारख्या महत्त्वाच्या अनेक पुढाऱ्यांना अटक केली. ब्रिटीश सरकारच्या दडपणशाहीमुळे सामान्य जनता अधिक खवळली सभा, मिरवणूका हरताळ, बहिष्कार, कायदेभंग यात सर्व जनतेने उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

सविनय कायदेभंग चळवळीत वऱ्हाडचे योगदान महत्त्वपूर्ण होते. या वैशिष्ट्यपुर्ण लढ्याकडे ब्रिटीश सरकारचेच नव्हे तर संपूर्ण जगातील लोकांचे लक्ष केंद्रीत झाले होते. वऱ्हाडातील सामान्य लोकांपर्यंत या लढ्याचे लोण पसरले. त्यामुळे संपूर्ण जनतेने व स्त्रियांनी उत्स्फुर्तपणे यात सहभाग घेतला. ब्रिटीशांनी सर्वत्र दडपशाही सुरु करुन स्थानिक पुढाऱ्यांना तुरुंगात पाठविले. मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि सरकारने जप्त केलेल्या

पुस्तकातील उताऱ्यांचे जाहीर वाचन अशा तीन पद्धतीचा अवलंब करुन वऱ्हाडात कायदेभंगाची चळवळ चालविण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये वऱ्हाडातील सामान्य जनतेप्रमाणेच स्त्रियांनी देखील महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. स्त्रियांनी जप्त वाडमय सप्ताह, दारु दुकानावरील निरोधने, विदेशी कापडावरील बहिष्कार व निरोधने, जंगल त्याग्रह, प्रांतिय युद्ध मंडळास सहाय्य दारुभट्टी लिलावाविरुद्ध जाहीर सभा, गढवाल दिनात सहभाग यासारख्या विविध कार्यामध्ये उत्स्फुर्त भाग घेतला. तुरुंगाची पर्वा न करता काही स्त्रिया धडाडीने कार्य करीत होत्या तर अनेक स्त्रियांनी आंदोलनाची पिछाडीची कामे सांभाळून चळवळीला मदत केली.

सविनय कायदेभंग चळवळीचे तीव्र प्रतिसाद संपूर्ण भारतामध्ये उमटु लागलेत. ब्रिटीश सरकारला करातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर देखील परिणाम झाला. तेव्हा गांधी इर्विन करारानुसार सविनय कायदेभंगाची चळवळ थांबविण्याचे गांधीजींनी मान्य केले. या करारातील अटींची पायमल्ली लॉर्ड वेलिंग्टन यांनी केली. लोकांमध्ये दहशत निर्माण करुन सामान्य जनतेला स्वातंत्र्य लढ्यापासुन दुर ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न होता. तसेच प्रथम व द्वितीय गोलमेज परिषदेमध्ये जातीय स्तरावर फुट पाडण्याचा प्रयत्न ब्रिटीश सरकारकडून करण्यात आला. अशा परिस्थितीत मार्च १९३१ मध्ये स्थगित करण्यात आलेली कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मातृभूमीतील स्त्रिया आणि राजकारण ह्या लेखात त्या लिहितात सत्याग्रहयुद्धात स्त्रियांनी प्रथमपासून शेवटपर्यंत पुरुषांच्या बरोबरीने सर्व प्रकारची कामे केलेली आहेत. सरोजिनी नायडू सारख्या व कस्तुरबा गांधी सारख्या काही थोर स्त्रियांनीच केवळ मोठी व साहसाची कामे केली असे नाही, तर देशातील सर्व लहानमोठ्या स्त्रियांनीही ती केली आहेत. सर्व लहानमोठ्या शहरातच ही गोष्ट घडली असे नव्हे तर पाच घरांच्या लहानातील लहान खेड्यातही सत्याग्रहयुद्धात स्त्रियांनी कामे केली.

दारुनिरोधने व परदेशी मालावरील निरोधने ही कामे तर स्त्रियांचीच म्हणून ठरली असल्याने ती त्यांनी केलीच. पण त्याशिवाय त्यांनी मिठाचा सत्याग्रह केला, जंगलचा कायदेभंग केला (१४४) कलम मोडून मिरवणूकी काढल्या, युद्धमंडळे चालविली, अध्यक्ष, युद्धमंत्री,

कॉंग्रेस पत्रिकेच्या संपादिका वगैरे जे पडेल ते काम स्त्रियांनी केले. प्रभातफेऱ्या व झेंडावंदने अखंड चालूच ठेवली, सत्याग्रह प्रोत्साहक वाङःमय छापले, जप्त वाङमय जाहीर सभांमधून वाचले, दौरे काढले, प्रचार केला, चरखामंदिरे चालविली. राजकीय चळवळीच्या दृष्टीने स्त्रियांनी सत्याग्रह युद्धात भाग घेतल्याने युद्धाला विलक्षण चालना मिळाली व त्याचा देशाला फार मोठा उपयोग झाला.

भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्य संग्रामाचे लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे भारतीय महिलांचे स्वातंत्र्य संग्रामातील उत्स्फुर्त व उत्साहपूर्ण सहभाग होय. शेकडो वर्ष घराच्या चौकटीत अडकून पडलेल्या भारतीय महिलांनी परंपरागत चौकट ओलांडली आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंबहूना काही ठिकाणी पुरुषांपेक्षाही पुढे जावून ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला. सुशिक्षित, अशिक्षीत, गर्भश्रीमंत-दरिद्री, भिन्न धर्माच्या, भिन्न जातीच्या, भिन्न संस्काराचा प्रभाव असलेल्या लक्षावधी भारतीय महिला धैर्याने स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्या. साऱ्या जगाच्या इतिहासात अपवादानेच आढळणारे हे वास्तव आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांच्या सहभागाला वैशिष्ट्यपुर्ण स्थान आहे. कारण महिलांनी कोणत्याही गोष्टीचा विचार न करता केवळ देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून स्वातंत्र्याच्या पेटत्या यज्ञकुंडात उडी घेतली. अत्यंत धीटाने जुलमी ब्रिटीश सत्तेचा सामना करुन त्यांना हादरवून सोडले.

दडपशाहीला न जुमानता वऱ्हाडातील शिक्षित, अशिक्षित, उच्च-सामान्य घरातील तसेच तळागाळातील असंख्य स्त्रियांनी व जनतेने प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या या चळवळीत भाग घेवून ब्रिटीशांविरुद्ध अतिशय महत्त्वाची कामगिरी केली. यामध्ये वऱ्हाडातील दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, लिलाताई ओक, विजयालक्ष्मी मश्रुवाला, काशीताई लिमये, यशोदाबाई आगरकर, सुशीला गांधी, राधाबाई ओक, उमाबाई मराठे, रमाबाई केळकर, मनुताई कोल्हटकर, कमलाताई भागवत, गंगुबाई बापट, सुंदरबाई देशमुख, सुभगाबाई काशिकर, उमाबाई खपली, पार्वताबाई पटवर्धन, लक्ष्मीबाई दांडेकर, आनंदीबाई दामले, लक्ष्मीबाई सोमण, रंगुबाई भिडवाईक, अन्नपूर्णाबाई बाळ, माई टकले, लक्ष्मीबाई आपटे, ताराबाई कानीटकर आणि इतर स्त्रियांचे सदर चळवळीत योगदान महत्त्वाचे होते. तर अमरावती

जिल्ह्यामध्ये चंद्रभागाताई पटवर्धन, दुर्गाताई जोग यांना कायदेभंग केल्याबद्दल कारावास पत्करावा लागला. सविनय कायदेभंग चळवळीमध्ये बुलढाणा येथील ॲड. सिद्धेश्वर गोरे आणि अमरावती जिल्ह्यातील यावली गावचे लक्ष्मणराव पाचघरे यांनी प्राणाचे बलीदान दिले.

पश्चिम विदर्भातील महिलाही सविनय कायदेभंग चळवळीत पुरुषांसोबत आघाडीवर होत्या. अकोला येथील महिलांचे कार्य तर अजोड आहे. दुर्गाताई जोशी, ताराबेन मश्रुवाला, यशोदाबाई आगरकर, सरस्वतीबाई मेहरे यमुनाबाई ताकवाले, सुशिलाबाई गांधी, राधाबाई ओक, प्रमिलाताई ओक, लिलाताई ओक, काशीताई लिमये, सुभगादेवी काशीकर यांच्या पुढाकारामुळे या भागातील महिलांमध्ये चांगलीच जागृती झालेली होती. या चळवळीत अकोला येथील महिलांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेवून मोलाची कामगिरी केली.

यवतमाळ जिल्ह्यातील आनंदीबाई दामले, लक्ष्मीबाई सोमण, रंगूबाई मिडवाईक, लक्ष्मीबाई आपटे, अन्नपूर्णाबाई बाळ, माई टकले, द्रोपदीबाई चव्हाण, काशीबाई काळे, उमाबाई शंकरराव भालचंद्र यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

यवतमाळ आणि बुलडाणा या जिल्ह्यातील महिलांही कमी संख्येने का होईना पण या लढ्यात सहभागी होत्या. यवतमाळ येथील आनंदीबाई दामले यांनी अत्यंत पराक्रमाने पुढे येऊन लोकांना ब्रिटीशांविरुद्ध जागृत केले. तर रंगुबाई मिडवाईक, भगवती परदेशी, मंजुषा मुसलमान, रंगुबाई नाईक यांनी सश्रम कारावासाची शिक्षा भोगली. बुलढाणा जिल्ह्यातील महिला गांधी युगातील सर्वच आंदोलनात आघाडीवर होत्या. शांताबाई मेवाडे, सीताबाई झुनझुनवाला, पार्वतीबाई पारसनिस, जीजीताई देशपांडे, रुक्मीणीताई कोरडे, इंदिराताई ताकलोटे, ताराबाई कार्नाटकर यांनी प्रचारकार्य केले. आणि जीजीताई देशपांडे, रुक्मीणीताई कोरडे यांना तुरुंगवास भोगावा लागला.

या लढ्यात सहभागी झालेल्या महिलांनी तुरुंगाची पर्वा न करता धडाडीने कार्य करीत राहिल्या. काही स्त्रियांनी पिछाडीची कामे करुन चळवळीला मदत केली. भूमिगतांना अनेक ठिकाणी स्त्रियांनी केलेली मदत स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. ब्रिटीशांच्या दडपशाहीला न जुमानता विदर्भातील सर्वच जिल्ह्यातील सर्व स्तरातील असंख्य स्त्रियांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या या चळवळीत भाग घेवून स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला.

एकूणच वऱ्हाडमधील सामान्य जनता व स्त्रियांनी सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी होऊन अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले. देशभक्तीचा ध्यास घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जनतेने व स्त्रियांनी कुटुंबाचा, मुलाबाळांचा विचार न करता जुलमी सत्तेविरुद्ध लढा दिला. दडपशाहीची पर्वा न करता सामान्य जनता व महिला या आंदोलनात पुढे होत्या. तुरुंगवासाची शिक्षा आनंदाने भोगल्या. प्रत्यक्षात लढ्यात सहभाग न घेतलेल्या अनेक स्त्रियांनी पिछाडीवर राहून जमेल ते काम केले. भूमिगतांना आवश्यक ती मदत केली, प्रोत्साहन दिले. पुरुष आंदोलनात व कैदेत असतांना कुटुंबाची जबाबदारी योग्यपणे सांभाळली अशा असंख्य महिलांचे कार्य सुद्धा विशेष महत्त्वाचे होते. अशा असंख्य महिलांच्या कार्याची नोंद इतिहासात सापडत नाही. ही फार मोठी खंत आहे. इतिहासाला अज्ञात असलेल्या अनेक महिलांची कामगिरी दुर्लक्षित करता येत नाही. त्यांचा शोध घेऊन त्यांचे कार्य प्रकाशात आणणे हे भावी संशोधकासमोरील महत्त्वाचे काम आहे. प्रस्तुत संशोधन हे त्या दृष्टीने दिशा दाखविणारे आहे.

राष्ट्रकार्यासाठी स्वतःला सर्वस्वी वाहून घेतलेली राष्ट्रभक्तांची पिढी वऱ्हाडने राष्ट्रीय राजकारणास दिली. त्यामुळेच मध्यप्रांत वऱ्हाडच्या राजकारणाचे तत्कालीन राजकारणातील अभिमानास्पद स्थान सर्वांनाच मान्य करावे लागते.